| MHCO100000072026 | दाखल ता. | : | ०३/०१/२०२६ |
|---|---|---|---|
| | नोंदणी ता. | : | ०३/०१/२०२६ |
| | निकाल ता. | : | १८/०७/२०२६ |
| | कालावधी : ००व. ०६म. १६दि. | | |

**सांगली येथील मे. न्यायाधीश, सहकार न्यायालय क्र. २ यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती ए. जे. पाटील)**

**सहकारी वाद क्र. : ०२/२०२६**

१. श्री. धनसंचेती नागरी सहकारी पतसंस्था मर्या. मिरज
जि. सांगली तर्फे कार्यलक्षी संचालक
श्री. अशोक ज्ञानबा जाधव
व. व. ५३, धंदा - नोकरी
रा. श्री. राघवेंद्र स्वामी मठ, ब्राम्हणपुरी, मिरज. } **वादी**

**विरुध्द**

१. मिस् डायना मधुकर कांबळे
व. व. २९, धंदाः नोकरी
रा. साळुंखे पार्क, MIDC, मिरज

२. श्री. डॉ. राजीव रामचंद्र भडभडे
व. व. सज्ञान, धंदाः डॉक्टर
रा. अद्वैत बंगला, शिवाजी नगर, मिरज

३. सौ. वैशाली विजय भोसले
व. व. सज्ञान, धंदाः नोकरी
रा. गोरे मंगल कार्यालयाजवळ, ब्राम्हणपुरी, मिरज } **प्रतिवादी**

..........................................................................

**दावा : रक्कम रु. १,८०,३९१/– व्याजासह वसुलीसाठी**

..........................................................................

.........................................................................................
वादीतर्फे वकील : श्री. एस. एम. चौगुले
प्रतिवादी क्र. १ ते ३ : एकतर्फा
.........................................................................................

# निकालपत्र

**(घोषित दिनांक : १८/०७/२०२६)**

प्रस्तुत दावा वादी नागरी सहकारी पतसंस्थेने प्रतिवादी कडून वैयक्तिक व संयुक्तिकरित्या रक्कम रु. १,८०,३९१/- व्याजासह वसुल होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः-**

१. वादी ही महाराष्ट्र सहकारी कायदा, १९६० प्रमाणे नोंद झालेली सहकारी संस्था असुन प्रतिवादी क्र. १ ते ३ हे तिचे सभासद आहेत. वादी ही बँकिंग स्वरुपाचा व्यवसाय करते.

२. यातील प्रतिवादी क्र. १ यांनी लग्न कार्याकरीता वादीकडून रक्कम रु. ७०,०००/- च्या कर्जाची मागणी केली व ती कर्ज रक्कम प्रतिवादी यांनी मंजूर करुन धनादेशाद्वारे दि. १०/०१/२०१८ रोजी प्रतिवादींना अदा केली. सदर कर्जास प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी जामिनदार म्हणून कर्ज फेडीची जबाबदारी स्विकारली व त्यानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे लिहून व सह्या करुन वादींना सुपुर्द केली. प्रतिवादी यांनी कर्ज रक्कमेची उचल केलेनंतर कर्जाचे हफ्ते व व्याजाची रक्कम मुदतीत भागविलेली नाही. उभय पक्षांमध्ये कर्जास व्याजदर द.सा.द.शे. १४ टक्के व मुदतीत फेड न केल्यास ३ टक्के दंडव्याज आकारणेबाबत करार झाला. तसेच संस्थेच्या नियमाप्रमाणे व्याजदरात काही बदल झाल्यास त्याप्रमाणे व्याज देणेचे प्रतिवादींनी कबूल केले. प्रतिवादी यांनी कर्ज हफ्त्याची परतफेड चुकविल्यामुळे वादींना सर्व कर्ज रक्कम एकरकमी वसुल करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. तद्नंतर वादींनी प्रतिवादींना थकबाकी मागणीची नोटीस पाठविली. ती मिळूनही थक रक्कमेचा भरणा न झाल्याने वादींना हा दावा र. रु. १,८०,३९१/- द.सा.द.शे. १४ टक्के व्याजदराने तसेच ३ टक्के ज्यादा व्याजदराने वसुल होऊन मिळणेकरीता दाखल करणे भाग पडले.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दाव्याचे समन्स मिळूनही प्रतिवादी क्र. १ ते ३ दाव्यात हजर झाले नसल्याने दि. २३/०२/२०२६ व दि. २५/०६/२०२६ रोजी त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आले.

४. त्यानंतर वादी यांनी नि. १५ वर त्यांचे सचिव अशोक ज्ञानबा जाधव यांचेमार्फत सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले व सदर साक्षीदारातर्फे सर्व दाखल कागदपत्रे शाबित केली. वादी यांनी नि. १६ संचालक मंडळ सभा १४/११/२०२५ रोजीचा ठरावाचा लागूपुरता उतारा, नि. १७ कर्ज मागणी अर्ज, नि. १८ वचनचिठ्ठी, नि. १९ प्रतिज्ञापत्र, नि. २० कर्ज रोखा, नि. २१ दावापुर्व नोटीस, नि. २५ ते २७ पोहोच/लखोटे, नि. २७अ खातेउतारा ही सर्व कागदपत्रे निर्विवाद शाबित करुन त्यांच्या दाव्यातील कथनापृष्ट्यर्थ सबळ व योग्य पुरावे न्यायालयासमोर दाखल केले. वरील सर्व कर्ज कागदपत्रांवरुन प्रतिवादी क्र. १ यांनी वादी संस्थेकडून र. रु. ७०,०००/- चे कर्ज मागणी करुन त्याचा वापर केल्याचे तसेच सदर कर्जाकरिता भारतीय करार कायद्यानुसार करारपत्र करुन दिल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. २ व ३ वादीच्या कर्जास जामिनदार म्हणून राहिले असे सिध्द होते. सदर प्रतिवादी यांनी या दाव्यास व कागदपत्रास कोणतीही हरकत नोंदविली नसल्याने ती कागदपत्रे प्रतिवादींना दाव्यातील कथनांसह मान्य असल्याचे शाबित होते. वादी यांनी नि. २७अ वर खातेउतारा दाखल करुन त्यांची येणेबाकी सिध्द केली आहे. सदर खातेउता-यात वादींनी उभय पक्षांमध्ये ठरलेल्या करारानुसार १४ टक्के व्याजदराने आकारणी केल्याचे दिसून येते. सबब, वादी ही खातेउता-याप्रमाणे शिल्लक दर्शविलेली रक्कम तसेच दंडव्याज सोडून व्याज रक्कम व सरतपासात मागणी केल्याप्रमाणे दावा दाखल तारखेपर्यंतचे व्याज ही रक्कम वसुल करण्यास पात्र आहे. वादी यांनी खातेउता-यामध्ये चक्रवाढ व्याजदराने आकारणी केल्याचे आढळून येत असल्याने प्रचलित कायद्यानुसार वादींना दंडव्याजाची आकारणी करण्याची मंजूरी देता येत नाही. वादी यांनी इतर खर्चाची रक्कम मागणी केली आहे परंतू त्यासंबंधी योग्य पुरावा दाखल केला नसल्याने ती मागणी फेटाळण्यात येत आहे. अशा प्रकारे वादी यांनी र. रु. १,७३,२९२/- इतकी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेकडून वैयक्तिक व संयुक्तिकरित्या द.सा.द.शे. १४ टक्के व्याजदराने दि. ०३/०१/२०२६ पासुन ते संपुर्ण रक्कम फिटेपर्यंत वसुलपात्र असल्याचे शाबित केले आहे.

सबब, वरील सर्व पुरावे व साक्षीदार यांचे प्रतिज्ञापत्रावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:-

# आदेश

१. वादीचा दावा अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी यांस रक्कम रु. १,७३,२९२/- इतकी द. सा. द. शे. १४ टक्के व्याजदराने दि. ०३/०१/२०२६ पासुन संपुर्ण रक्कम फेड होईपर्यंत वैयक्तिक व संयुक्तिकरित्या देणेची आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्याचा खर्च वादीस देणेचा आहे व स्वतःचा स्वतः सोसणेचा आहे.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात जाहीर)

ANUSAYA JAGANNATH PATIL

Digitally signed by ANUSAYA JAGANNATH PATIL
Date: 2026.07.18 15:48:04 +0530

(श्रीमती ए. जे. पाटील)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय क्र. २, सांगली

सांगली
दिनांक: १८/०७/२०२६

*****